| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **CNR NO.MHNS110016262013** | दाखल दिनांक | : | २६/०४/२०१३ | | |
| | नोंदणी दिनांक | : | २६/०४/२०१३ | | |
| | निकाल दिनांक | : | १०/०३/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | १२ | १० | १२ |
| | **<u>निशाणी क्र.५९</u>** | | | | |

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, निफाड यांचे न्यायालयात

( *पिठासीन अधिकारी एस. पी. देशपांडे* )

## नि. फौ. खटला क्र.६००५६/२०१३

(निफाड पोलीस ठाणे गु.र.क्र.२५/२०१३)

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | ... | **महाराष्ट्र सरकार**<br>तर्फे पोलीस ठाणे अंमलदार<br>निफाड पोलीस ठाणे, ता. निफाड |
| **फिर्यादीतर्फे अभियोक्ता** | ... | **श्रीमती आर. बी. जाधव** |
| | | **विरुध्द** |
| **आरोपी ...** | ०१. | **विकास जयराम जगताप,**<br>वय : ३० वर्षे, |
| | ०२. | **चंद्रकांत बाबुराव खडताळे,**<br>वय : ३२ वर्षे, |
| | ०३. | **सुनिल म्हसु आव्हाड (मयत)**<br>सर्व रा. आंबेडकर नगर, निफाड,<br>ता. निफाड, जि. नाशिक. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | ... | **श्री. एस. एच. शेजवळ** |

**(फौजदारी आदेशीका प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(II) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १२.०२.२०१३ |
| गुन्हयाचे प्रथम खबरीचा दिनांक | : | १३.०२.२०१३ |
| आरोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | २६.०४.२०१३ |

| | | |
|---|---|---|
| आरोपींवर आरोप ठेवल्याचा दिनांक | : | ०६.०४.२०१५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | ०५.०७.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | : | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १०.०३.२०२६ |
| शिक्षा असल्यास, शिक्षा ठोठावल्याचा दिल्याचा दिनांक | : | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी ? | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विकास जयराम जगताप | दि.१३.०२.२०१३ | दि.१४.०२.२०१३ | भा.दं.वि. ३९४,३४१, ५०४ व ५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | चंद्रकांत बाबुराव खडताळे | दि.२६.०२.२०१३ | दि.०१.०३.२०१३ | -।।- | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | सुनिल म्हसु आव्हाड (मयत) | दि.२७.०२.२०१३ | दि.२७.०२.२०१३ | -।।- | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# न्या य नि र्ण य

**( घोषणा दिनांक १० मार्च, २०२६ )**

**०१.** प्रस्तुत प्रकरण हे आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३९४, ३४१, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दाखल करण्यात आले आहे.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :**

**०२.** फिर्यादी प्रल्हाद बाबुराव धुमाळ हे गणेशनगर, निफाड, ता. निफाड, जि.नाशिक येथील रहिवासी आहेत. त्यांनी त्यांची जुनी गाडी इंडिका क्र.एम.एच.२ ए.वाय.६२ ही मयत आरोपी क्र.३ सुनिल म्हसू आव्हाड यास रक्कम रूपये १ लाख ७० हजार साठी विक्री केली होती.

त्यातील रक्कम ७० हजार देणे बाकी होते. त्याची अनेकदा फिर्यादीने आरोपीकडे मागणी केली असता आरोपीने रक्कम देण्यास टाळटाळ केली होती. त्यावरून त्यांच्यात भांडण देखील झाले होते व त्यातून फिर्यादीच्या पत्नीने आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली होती.

**०३.** दि.१२.०२.२०१३ रोजी सायंकाळी ०७:०० फिर्यादी त्याच्या मोटार सायकलने भाजीपाला घेण्यासाठी जात असतांना शिवाजी चौकात समोरून आरोपी क्र.१ ते ३ असे मोटार सायकलने फिर्यादीच्या मोटार सायकलला त्यांची मोटार सायकल आडवी लावली. त्या तिघांनी आमच्याकडे पैसे का मागतो असे म्हणून फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्याला खाली पाडून मारहाण केली. तसेच त्याच्या गळयातील सोन्याची चैन व खिशातील रक्कम रू.५०००/— रूपये व मोबाईल बळजबरीने काढून घेतली व त्याला मारहाण करून तु जर पैशांची मागणी केली तर तुला जिवे मारून टाकू असा दम दिला. तो मोठमोठयाने ओरडला, वाचवा वाचवा तेव्हा चौकांतील काही लोक धावत आले तेव्हा तिघे आरोपी त्याच्या गळयातील चैन, रोख रक्कम रू.५०००/— व मोबाईल असे घेवून पळून गेले. फिर्यादीच्या उजव्या डोळयाला, छातील, पाठीत मुका मार लागला. त्याला जास्त मार लागल्याने तो तसाच पोलीस ठाण्यात गेला. त्यानंतर औषधोपचारासाठी यादी घेवून निफाड सरकारी दवाखाण्यात उपचार करून सिव्हील हॉस्पीटल, नाशिक येथे उपचारासाठी गेला. उपचार झाल्यानंतर त्याने आरोपी क्र.१ ते ३ विरोधात निफाड पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदविली.

**०४.** फिर्यादीच्या फिर्यादवरुन आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३९४, ३४१, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा क्रमांक २५/२०१३ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक श्री. बी. टी. बारवकर, पोलीस निरीक्षक यांचेकडे देण्यात आला. तपासिक अंमलदाराने घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे त्यांच्या सांगितल्याप्रमाणे जबाब नोंदवले व तपास पूर्ण होताच आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

केले.

**०५.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द निशाणी क्रमांक २५ अन्वये भारतीय दंड विधानचे कलम ३९४, ३४१, ५०४ व ५०६ सह कलम ३४ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपींना त्यामधील मजकूर त्यांच्या बोलीभाषेत वाचून दाखविण्यात आला. त्यांनी दोषारोप अमान्य करुन खटला चालविण्याची मागणी केली. आरोपींचा बचाव, प्रस्तुत प्रकरण पूर्णपणे खोटे असे आहे. त्यानंतर आरोपी क्र.०३ हे दि.०६.०६.२०१६ रोजी मयत झाल्याने त्याच्याविरूध्द केस अॅबेट झाल्याचा आदेश दि.१३.०९.२०१६ रोजी माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी पारित केलेला आहे.

**०६.** प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांनी संयुक्तीक पुरसिस निशाणी क्रमांक ५५ अभिलेखावर दाखल करुन प्रस्तुत प्रकरणात त्यांच्यामध्ये तडजोड झाली असून फिर्यादीला आता सदर प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे कळविले.

**०७.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील व आरोपींतर्फे त्यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाची हकीकत व प्रस्तुत प्रकरणात सादर केलेल्या सर्व साक्षीपुराव्यांचे अवलोकन करता माझे निष्कर्षाकरीता उपस्थित झालेले मुद्दे कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| {१} | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १२.०२.२०१३ रोजी ०७.३० वाजेच्या सुमारास शिवाजी चौक, निफाड, ता. निफाड, जि. नाशिक येथे आरोपींनी संगनमत करून फिर्यादीची सोन्याची चैन, रोख रक्कम व मोबाईल चोरून नेला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३९४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नाही.** |
| {२} | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादीस पुढे जाण्यास अडथळा आणला आणि त्यांना अन्याय्य परिरोध केला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३४१ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | |
| {३} | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानित केले व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलल ३४ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| {४} | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र दमदाटी केली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| {५} | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**का र ण मि मां सा**

**०८.** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी साक्षीदार क्रमांक ०१ गोकुळ दिलीप केदार (पंच) याची साक्ष निशाणी क्रमांक ५४ अन्वये नोंदविली. साक्षीदार क्र.०२ फिर्यादी प्रल्हाद बाबुराव धुमाळ याची साक्ष निशाणी क्रमांक ५६ अन्वये नोंदविली. फिर्यादीवरील स्वाक्षरी निशाणी क्रमांक पी—१/पीडब्ल्यु—१ वर आहे. सहा. सरकारी वकील यांनी पुरसिस निशाणी क्रमांक ५८ दाखल करुन त्यांना सदर प्रकरणात आणखी साक्षीदार तपासवयाचे नसल्याचे कळविले. अभियोग पक्षाच्या साक्षीदाराच्या साक्षेत आरोपींविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे आरोपींचे बयाण कलम ३५१(१)(ब) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता अन्वये नोंदविण्यात आले नाही. आरोपींनी त्यांच्या बचावाच्या समर्थनार्थ कोणताही मौखिक किंवा कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. मी दोन्ही पक्षांतर्फे युक्तीवाद ऐकून घेतला आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ करीता :</u>**

०९. मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ हे एकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे विवेचनाच्या सोयीकरिता त्यांना एकत्रित विचारात घेण्यात येत आहे.

१०. साक्षीदार क्रमांक ०१ गोकूळ दिलीप केदार याने त्याच्या साक्षेत कथन केले की, पोलिसांनी त्याला पंच म्हणून कोठेही बोलविले नव्हते. पोलीसांनी त्याच्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला नव्हता. साक्षीदाराने पंचनाम्यावरील त्याची सही ओळखली. परंतु त्यामधील मजकुराबाबत पूर्णतः अनभिज्ञता दर्शविली. साक्षीदार हे अभियोग पक्षाच्या कथनांच्या पुष्टयर्थ साक्ष देत नसल्याच्या कारणावरुन सरकारी वकीलांनी त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. न्यायालयाच्या परवानगीने त्याची कसून उलटतपासणी घेतली. परंतु पुढे त्याने फिर्यादीमधील संपुर्ण मजकूर स्पष्टपणे नाकारला आहे. अशाप्रकारे अभियोग पक्षाच्या या महत्त्वाच्या साक्षीदाराच्या साक्षेत आरोपींविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, साक्षीदार क्र.१ ची साक्ष ही अभियोग पक्षाला प्रस्तुतचा गुन्हा शाबीत करण्यासाठी काहीही उपयोगी ठरत नाही.

११. साक्षीदार क्रमांक ०२ फिर्यादी प्रल्हाद बाबुराव धुमाळ याने त्याच्या साक्षेत कथन केले की, घटना किती वाजता, कोठे व केव्हा घडली हे त्याला आठवत नाही. फिर्यादीने फिर्यादवरील त्याची सही ओळखली. परंतु त्यामधील मजकुराबाबत पूर्णतः अनभिज्ञता दर्शविली. म्हणून फिर्यादला फिर्यादीच्या सहीच्या हद्दीपर्यंत निशाणी क्रमांक पी—१/पीडब्ल्यु—१ देण्यात आली. फिर्यादी हे फिर्यादप्रमाणे साक्ष देत नसल्याच्या कारणावरुन सरकारी वकीलांनी त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. न्यायालयाच्या परवानगीने त्याची कसून उलटतपासणी घेतली. परंतु पुढे त्याने फिर्यादीमधील संपुर्ण मजकूर स्पष्टपणे नाकारला आहे.

१२. याउलट त्याने कबूल केले की, त्यांची आरोपींसोबत

न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली आहे. त्याला आरोपींच्या विरोधात काहीही तक्रार राहिलेली नाही. अशाप्रकारे अभियोग पक्षाच्या या महत्त्वाच्या साक्षीदाराच्या साक्षेत आरोपींविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, फिर्यादीची साक्ष ही अभियोग पक्षाला प्रस्तुतचा गुन्हा शाबीत करण्यासाठी काहीही उपयोगी ठरत नाही.

**१३.** अभियोग पक्षाचे महत्त्वाचे साक्षीदार म्हणजे ०१ पंच, साक्षीदार क्रमांक ०२ फिर्यादी यांनी अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ त्यांच्या साक्षीत घटनेबाबत पूर्णतः अनभिज्ञता दर्शविली. त्यामुळे त्यांच्या साक्षीत आरोपींविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. वर नमुद केल्याप्रमाणे फिर्यादीचे आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड झाल्याचे दिसून येते. कदाचित त्यामुळे त्यांना आरोपींविरुध्द साक्ष देण्यात काही स्वारस्य राहिले नसावे. परंतू, कारण काही असले तरी फिर्यादीच्या साक्षीत आरोपींविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच अभियोग पक्षाच्या एकही साक्षीदाराच्या साक्षेत आरोपींविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार केला असता मी या निष्कर्षावर येऊन पोहोचले आहे की, अभियोग पक्ष आरोपींविरुध्द कसलाही गुन्हा संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयशी ठरले आहे. म्हणून मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०५ करीता</u> :**

**१४.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविलेले आहे. म्हणून मी मुद्दा क्रमांक ०५ करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. आरोपी क्रमांक ०१ **विकास जयराम जगताप**, आरोपी क्रमांक ०२ **चंद्रकांत बाबुराव खडताळे**, यांची या खटल्यातून भारतीय

नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) अन्वये, भारतीय दंड विधानचे कलम ३९४, ३४१, ५०४ व ५०६ सह कलम ३४ या गुन्ह्यांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपींचे जामीन कद्बे रद्द करण्यात येत आहेत.

०४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७—अ अन्वये प्रत्येकी रु.१५,०००/— (रुपये पंधरा हजार फक्त) ची जामीन दयावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SNEHA PRADEEP DESHPANDE
Digitally signed by SNEHA PRADEEP DESHPANDE
Date: 2026.03.12 15:10:41 +0530

दिनांक : १०.०३.२०२६                    **( एस. पी. देशपांडे )**
स्थळ : निफाड                    न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
निफाड.

**(फौजदारी आदेशीका प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(III) अन्वये)**

**अभियोजन पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्ष.**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ नि.क्र.५४ | **गोकूळ दिलीप केदार** | पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ नि.क्र.५६ | **प्रल्हाद बाबुराव धुमाळ** | फिर्यादी |

**ब. बचावपक्ष.**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार.**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र. | निरंक | निरंक |

**पुराव्यादरम्यान दिलेल्या निशाण्या व वस्तुंचे क्रमांकाची यादी**

**अ. अभियोगपक्ष.**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र.पी-१/ अ.सा.क्र.१ | फिर्यादीवरील स्वाक्षरी |

**ब. बचावपक्ष.**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी.**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | ५७ | घटनास्थळ पंचनामा |

**ड. महत्वाच्या वस्तु : (Material Objects)**

| **क्रमांक** | **महत्वाच्या वस्तुंचे क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

SNEHA PRADEEP DESHPANDE
Digitally signed by SNEHA PRADEEP DESHPANDE
Date: 2026.03.12 15:10:33 +0530

दिनांक : १०.०३.२०२६
स्थळ: निफाड

**( एस. पी. देशपांडे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
निफाड.